सोमवार दि. १७ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



## जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध - पालकमंत्री पंकजा मुंडे

**स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण; शेतकरी, पशुपालक, युवकांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून लाभ**





छाया - किरण खानापुरे

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेतकरी, पशुपालक, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी राज्य शासन विविध योजना राबवून लाभ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असुन यामाध्यमातून शासन जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबध्द असल्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी सांगितले.

भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधु, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी २०२६-२७ या वर्षासाठी ५४७.९७ कोटी रुपयांच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यास जिल्हा नियोजन समितीने मंजुरी दिली आहे. जिल्हा स्थापनेला ४५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त 'रायझिंग जालना' हा विशेष विकासात्मक कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. बीज, स्टील आणि रेशीम हे जालना जिल्ह्याच्या विकासाचे तीन प्रमुख आधार असून, त्यावर आधारित विकासाला चालना देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. जालन्यातील महिलांनी रेशीमपासून साडी विणकाम सुरू केले असून त्यांचे कौशल्य आणि तयार होणाऱ्या वस्त्रांची गुणवत्ता उल्लेखनीय आहे. जालन्यात तयार होणाऱ्या सिल्क उत्पादनांच्या जालनाई हा एक मोठा ब्रँड म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

**जिल्ह्यात ५ लाख ६८ हजार हेक्टरवर खरीप पेरणी**

यंदाच्या खरीप हंगामासाठी जिल्ह्यात ६ लाख २५ हजार हेक्टर क्षेत्र निश्चित करण्यात आले असून, आतापर्यंत ५ लाख ६८ हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यात पावसाने सरासरी गाठली असली तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे मोठ्या प्रकल्पांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झालेला नसल्याचे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ**

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी



# संपादकीय...

## 'स्टील, सिड नंतर सिल्क'चा संकल्प; पण जालन्याच्या विकासाचा रोडमॅप कुठे?

फडणवीसांच्या घोषणांनी अपेक्षा उंचावल्या; आता प्रश्न भाषणांचा नाही, तर उद्योग, पाणी, रोजगार आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात प्रत्यक्ष बदल घडविण्याचा... मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जालना दौऱ्यात अनेक घोषणा झाल्या. जालन्याला 'स्टील, सिड आणि सिल्क' अर्थात 'ट्रिपल एस'ची ओळख देण्याचे स्वप्न त्यांनी मांडले. मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या वीजबिलापासून कर्जमाफीपर्यंत, महिलांच्या 'लाडकी बहीण' योजनेपासून औद्योगिक विकासापर्यंत सरकारच्या निर्णयांचा लेखाजोखा त्यांनी मांडला. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी जालन्याच्या भविष्यासंदर्भात एवढी मोठी दृष्टी मांडणे निश्चितच स्वागतार्ह आहे. पण या घोषणांकडे केवळ राजकीय भाषण म्हणून पाहणेही योग्य ठरणार नाही आणि त्या घोषणांना विकासाचे अंतिम सत्य मानणेही योग्य ठरणार नाही. कारण जालन्याच्या जनतेसमोर आजचा खरा प्रश्न वेगळा आहे

'ट्रिपल एस'ची घोषणा झाली; पण त्यासाठी प्रत्यक्ष रोडमॅप काय? स्टील आहे, सिड आहे; आता 'सिल्क'ला उद्योगाची जोड कधी? जालना हा स्टील आणि बी-बियाणे उद्योगासाठी आधीपासूनच ओळखला जातो. रेशीम उत्पादनाचीही जिल्ह्यात क्षमता वाढत आहे. त्यामुळे 'स्टील, सिड आणि सिल्क' ही संकल्पना जालन्याच्या आर्थिक क्षमतेला योग्य दिशा देणारी ठरू शकते. पण तीन क्षेत्रांची नावे एकत्र घेतल्याने 'ट्रिपल एस' तयार होत नाही. स्टील उद्योगासाठी कच्चा माल, ऊर्जा, वाहतूक, बाजारपेठ आणि औद्योगिक पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. बी-बियाणे उद्योगासाठी संशोधन, तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण आणि जागतिक बाजारपेठ आवश्यक आहे. रेशीमसाठी उत्पादनाबरोबर प्रक्रिया उद्योग, कुशल मनुष्यबळ, ब्रँडिंग आणि मूल्यवर्धन आवश्यक आहे.

म्हणून सरकारने आता जाहीर भाषणापलीकडे जाऊन 'ट्रिपल एस डेव्हलपमेंट रोडमॅप' जाहीर करणे गरजेचे आहे.

पाच वर्षांत कोणत्या क्षेत्रात किती गुंतवणूक आणणार?

किती रोजगार निर्माण होणार?

किती नवीन उद्योग येणार?

किती शेतकरी या उद्योगांशी जोडले जाणार?

याची आकडेवारी जनतेसमोर आली तरच घोषणेचे धोरणात रूपांतर झाल्याचे मानता येईल.

औद्योगिक विकासासाठी केवळ छत्रपती संभाजीनगर पुरेसे नाही फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर-जालना हा महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा महत्त्वाचा पट्टा असल्याचे संकेत दिले आहेत. ही भूमिका जालन्यासाठी महत्त्वाची आहे.

मात्र जालन्याला केवळ मोठ्या औद्योगिक शहराच्या शेजारी असण्याचा फायदा मिळणार नाही. त्यासाठी स्वतःची औद्योगिक क्षमता वाढवावी लागेल.

जालन्यात उद्योग येण्यासाठी रस्ते, रेल्वे, वीज, पाणी, लॉजिस्टिक्स, औद्योगिक भूखंड, कौशल्यपूर्ण मनुष्यबळ आणि प्रशासकीय सुलभता आवश्यक आहे.

उद्योगपतींना जमीन मिळाली, पण पाणी नाही; उद्योग सुरू झाला, पण वीजपुरवठा अनियमित; उत्पादन झाले, पण वाहतुकीची समस्याअशी परिस्थिती राहिली तर 'इंडस्ट्रीचे मॅग्नेट' ही संकल्पना कागदावरच राहू शकते.

पाण्याचा प्रश्न सुटल्याशिवाय विकासाची खरी परीक्षा होणार नाही मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्याचे फडणवीसांचे आश्वासन भावनिकदृष्ट्या मोठे आहे. ''मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही,'' हा विश्वास देणारा संदेश आहे. पण जालन्यासारख्या जिल्ह्यासाठी पाणी हा केवळ शेतीचा विषय नाही. पाणी म्हणजे शेती, उद्योग, रोजगार, शहरांचा विस्तार आणि लोकसंख्येचे भवितव्य.

मराठवाड्यात पाणी आणण्याच्या योजनांची घोषणा अनेक दशकांपासून होत आली आहे. त्यामुळे आता जनतेला नव्या घोषणेपेक्षा अंमलबजावणीचे वेळापत्रक हवे आहे.

कोणते पाणी कुठून आणणार?

किती पाणी उपलब्ध होणार?

कोणत्या प्रकल्पातून किती लाभ मिळणार?

जालना जिल्ह्यातील किती गावांना त्याचा फायदा होणार?

काम कधी सुरू होणार आणि कधी पूर्ण होणार?

या प्रश्नांची उत्तरे मिळाली तरच 'दुष्काळमुक्त मराठवाडा' हा संकल्प वास्तवाच्या दिशेने जात आहे असे म्हणता येईल.

७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजआता उर्वरित शेतकऱ्यांचे काय? राज्यातील ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. हा दावा महत्त्वाचा आहे. मात्र शेतकऱ्यांच्या दृष्टीने पुढचा प्रश्न सरळ आहे

उर्वरित २४ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज कधी मिळणार?

दिवसा वीज मिळणे हा शेतकऱ्याच्या सुरक्षिततेचा आणि उत्पादनक्षमतेचा मुद्दा आहे. रात्रीच्या वेळी शेतात जाऊन वीज वापरण्याची वेळ टळली, तर शेतकऱ्याचा त्रास कमी होतो.

म्हणून ७६ टक्के हा आकडा अभिमानाचा विषय ठरण्यापेक्षा १०० टक्के दिवसा वीजपुरवठ्याचे लक्ष्य आणि त्याची मुदत जाहीर होणे अधिक महत्त्वाचे आहे. ५५ हजार कोटींची वीजबिल माफीयाचा लाभ नेमका कोणाला? शेतकऱ्यांच्या जुन्या वीजबिलांच्या संदर्भात ५५ हजार कोटी रुपयांच्या माफीचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. हा मोठा आर्थिक निर्णय आहे. मात्र एवढ्या मोठ्या रकमेच्या घोषणेची अंमलबजावणी कशी होणार, कोणत्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आणि कोणत्या कालावधीतील थकबाकी माफ होणार, याबाबत स्पष्टता जनतेला अपेक्षित आहे. कारण शेतकऱ्याला भाषणातील कोटींच्या आकड्यापेक्षा त्याच्या घराच्या किंवा शेतपंपाच्या बिलावर प्रत्यक्ष किती फरक पडतो, हे महत्त्वाचे आहे. ३६ हजार कोटींची कर्जमाफी; पण शेतकरी पुन्हा कर्जबाजारी का होतो? कर्जमाफी हा शेतकऱ्यांसाठी तातडीचा दिलासा असतो. फडणवीस यांनी ३६ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा उल्लेख केला. परंतु कर्जमाफीचा सर्वात मोठा विरोधाभास असा आहे की, कर्ज माफ होते; पण काही वर्षांनी शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होतो. म्हणून खरी गरज आहे ती शेतकऱ्याचे उत्पन्न कर्जापेक्षा वेगाने वाढविण्याची. पिकाला योग्य भाव, सिंचन, प्रक्रिया उद्योग, साठवणूक, बाजारपेठ आणि मूल्यवर्धन यांची व्यवस्था झाली तर कर्जमाफीची गरजच कमी होईल. शेतकऱ्याला वारंवार कर्जमाफी देण्यापेक्षा कर्जमुक्त राहण्याइतके उत्पन्न देणारी शेतीव्यवस्था उभी करणे हे अधिक टिकाऊ धोरण ठरेल. 'लाडकी बहीण' सुरू राहणार; पण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी कधी करणार? 'लाडकी बहीण' योजना बंद होणार नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# १७ ऑगस्ट क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा पुण्यतिथी

इंग्रजांच्या भुमित इंग्रज अधिकारी कर्झन वायलीची हत्या करणारे महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा. मदनलाल धिंग्रा यांचा जन्म १८ सप्टेंबर १८८३ ला अमृतसर येथे उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात झाला.त्यांचे वडील एक ख्यातनाम डॉक्टर होते आणि बंधू बॅरिस्टर होते. मदनलालांचे शिक्षण अमृतसरला झाले. ते पंजाब विद्यापीठातून बी. ए. झाले व १९०६ मध्ये उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तत्पूर्वी विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह झाला. इंग्लंडमध्ये त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचा अभ्यास केला. तेथील वास्तव्यात त्यांचा स्वातंत्र्यवीर सावरकर,श्यामजी कृष्णवर्मा, हरदयाळ शर्मा वगैरे क्रांतिकारकांशी स्नेह जमला व तेथूनच त्यांच्या हृदयात क्रांतीची मशाल धकधकायला लागली.इंग्लंडमध्ये शिकत असताना त्यांनी सर विलियम कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या केली. या घटनेचा २० व्या शतकातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील पहिल्या क्रांतीकारी घटनांपैकी एक म्हणून उल्लेख केला जातो. मदनलाल धिंग्रा होमरूल लीग व सावरकरांच्या अभिनव भारत या संस्थांचे सभासद झाले. त्यांच्या भावनाप्रधान मनावर खुदिराम बोस व कन्हैयालाल या क्रांतीवीरांच्या बलिदानाचा फार मोठा परिणाम झाला होता.त्यांनी सशस्त्र क्रांतिवीरास साजेसे शिक्षण घेतले. पुढे त्यांनी भारताच्या मंत्र्याचा स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली याच्या खुनाचा कट रचला. त्यांचा पहिला बेत फसला. पुढे १ जुलै १९०९ रोजी इंपीरियल इन्स्टिट्यूटच्या जहांगीर हाऊसमध्ये इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी त्यांनी कर्झन वायली यावर गोळ्या झाडल्या व त्यांची हत्या केली.कारण बंगालची फाळणी करण्यात कर्झन वायलीचा हात होता व भारतात ब्रिटिश सरकार व्दारे भारतीयांची अमानवी हत्या त्यांना पहावली नाही व अमानवी हत्यांचा बदला घेण्याच्या उद्देशाने इंग्लंडमध्ये म्हणजे त्यांच्या घरात घुसून कर्झन वायलीची हत्या केली व एक देशभक्त पूर्ण कृत्याच्या स्वरूपात विल्यस कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याला यमलोक पोहचविले व विदेशात जाऊन ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करणारा २० व्या शतकातील पहिला स्वतंत्र चळवळीतील क्रांतिकारक म्हणून मदनलाल धिंग्रा यांचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतले जाते.या खुनाबद्दल मदनलाल धिंग्रा यांना अवघ्या महिन्याभरात फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली व १७ ऑगस्ट १९०९ ला इंग्लंडच्या पेन्टोनव्हिल तुरुंगात फाशीची शिक्षा देण्यात आली व क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा 'भारत माता की जय'च्या उद्घोषात हसत हसत फासावर गेले.अशा महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा यांना कोटी कोटी प्रणाम.फाशीवर जाण्यापूर्वीच्या शेवटच्या वक्तव्यात मदनलाल धिंग्रा म्हणले आहे ''आत्म बलिदान कसे करावे ही एकच शिकवण सध्या हिंदुस्थानात देण्यायोग्य आहे. ही शिकवण देण्याचा एकच मार्ग म्हणजे स्वतःचे बलिदान करून मोकळे होणे होय''.१७ ऑगस्ट १९०९ हा दिवस कुणीही सच्चा देशभक्त कधीही विसरणार नाही. कारण याच दिवशी सर विल्यम हट कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याचा वध करणारे हुतात्मा मदनलाल दित्तमल धिंग्रा हसत हसत फासावर चढले.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी थोर क्रांतीकारकारकांच्या पावलावर पाऊल ठेवून देशहिताचे कार्य करण्याची गरज आहे. देशात वाढता भ्रष्टाचार, ढासळती शिक्षण प्रणाली, महागाई, भेसळयुक्त अन्नपदार्थ, ढासळती आरोग्य सुविधा,वाढती बेरोजगारी यावर अंकुश अती आवश्यक आहे.

कारण आज वाढता भ्रष्टाचार व राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेली वाममार्गाने कमविलेली अमाप चल-अचल करोडोंची संपत्ती यामुळे देशात महागाई, बेरोजगारी,भुकमरी,कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या इत्यादी मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.क्रांतिकारकांनी देश स्वतंत्र करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आपले बलिदान दिले.परंतू आज आपण स्वतंत्र भारतात वावरतो आहे.त्यामुळे क्रांतिकारकांच्या बलिदानाला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी, सरकारने, पक्ष- विपक्षांनी घेऊन देशहिताचे कार्य केले पाहिजे व देशाला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. इंग्रजांनी देशाला लुटले त्यापेक्षा हजार पटीने आजचा भ्रष्ट राजकीय पुढारी देशाला पोखरत आहे व देशाला खिळ-खिळा करीत आहे यावर सरकारने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे क्रांतिकारकांची जोत नेहमी प्रज्वलित रहावी व आपल्या हृदयात त्यांच्या आठवणी निरंतर जीवीत राहाव्यात यासाठी आजच्या दिवशी सरकार, प्रशासकीय विभाग, स्थानिक प्रशासन, सामाजिक संस्था व शाळा-महाविद्यालय यांनी वृक्षलागवडीला प्राधान्य दिले पाहिजे.कारण बदलत्या हवामानामुळे व अलनिनोच्या प्रभावामुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगले आहे यावर उपाय म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आवश्यक आहे.आजच्या दिवसाला जर आपण वृक्षारोपण केले तर प्रत्येक झाडाच्या पानात,फुलात,फळात व जळामुळात आपल्याला संपूर्ण क्रांतिकारकांचे अवश्य दर्शन होईल व हि आठवण निरंतर आपल्या हृदयात राहिल.शहीद मदनलाल धिंग्रा ह्यांना कोटी-कोटी प्रणाम,जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य



मुंबई, दि. १६ : चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रामधील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याला प्रशासनाने प्राधान्य द्यावे, मात्र पावसाळ्यात रस्ता दुरुस्तीसाठी येणाऱ्या अडचणी लक्षात घेता प्री-कास्ट तसेच जिओ पॉलिमर टेक्नो पॅच यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली १४ विभागांनी एकत्र येऊन तात्काळ कृती आराखड्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, पोलीस ठाणे, अग्निशमन केंद्र आणि विद्युत उपकेंद्रांसाठी एमआयडीसीकडून जागा उपलब्ध करून देण्यासह चाकण शहराच्या विकास आराखड्याला तात्काळ मंजुरी देण्यात येईल, अशी घोषणाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या विविध अडी-अडचणी जाणून घेण्यासाठी आयोजित बैठकीत उपमुख्यमंत्र्यांनी उपस्थितांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला.

या बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार डॉ. अमोल कोल्हे, विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार बाबाजी काळे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. अन्बलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त अभिजित चौधरी यांच्यासह चाकण, तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक आणि औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, ऊर्जा, पोलीस, नगररचना, कामगार, पीएमआरडीए आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र हे देशाचे औद्योगिक इंजिन आहे आणि त्या इंजिनाची खरी ताकद चाकण आणि तळेगाव सारख्या औद्योगिक पट्ट्यात आहे, त्यामुळे येथील उद्योगांना भेडसावणारा वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी कमी, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. पावसाळ्यामध्ये रस्त्यांची दुरुस्ती करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता आणि तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी ठाणे-नाशिक मार्गावर किंवा कशेडीच्या बोगद्यात वापरलेल्या प्री-कास्ट रस्त्यांचा फॉर्म्युला तसेच जिओ पॉलिमर टेक्नो पॅच यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

चाकण-तळेगाव परिसरातील उद्योगांच्या तसेच स्थानिक जनतेच्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी पुण्याचे जिल्हाधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील, सर्व १४ विभागांचे अधिकारी त्यांच्या समन्वयाने काम करतील, त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दर शुक्रवारी सर्वांची बैठक घेऊन कामांना गती देण्याचे निर्देशही यावेळी दिले.

चाकण औद्योगिक क्षेत्रात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांचा प्रशासनाने आढावा घेऊन या कामांना गती द्यावी तसेच कामात टाळाटाळ करून दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याच्या सूचनाही यावेळी दिल्या. औद्योगिक क्षेत्रातील मलनिस्सारण, घनकचरा, पाणी, रस्ते, वीज आदी एकमेकांशी निगडित असलेल्या सुविधांचा सर्वसमावेशक आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले.

चाकण शहरातील रस्त्यांच्या अवस्थेमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्त्याच्या कडेला पडणारे खड्डे बुजविण्याला देखील प्राधान्य द्यावे, आवश्यक असेल तेथे नवीन अंतर्गत रस्ते, पर्यायी मार्ग आणि उड्डाणपूल उभारणीचेही नियोजन करण्याच्या सूचना यावेळी दिल्या.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला चाकण शहराचा विकास आराखडा तातडीने मंजूर करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

वीजेचा प्रश्न सोडविण्यासाठी महापारेषणकडून ३१ ऑगस्टपर्यंत नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे नियोजन केले असून नवीन उपकेंद्रासाठी एमआयडीसी जागा उपलब्ध करून देणार आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, पोलीस ठाणे, अग्निशमन केंद्र, रुग्णालये आदींसाठी देखील एमआयडीसीकडून जागा उपलब्ध करून देईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर, रांजणगाव, चाकण एमआयडीसी यांना जोडणारा 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' तसेच उरण, कर्जत, राजगुरुनगर, शिरूर, पुणे या नवीन महामार्गामुळे चाकण परिसरातील औद्योगिक विकासाला चालना मिळेल आणि वाहतूक कोंडी दूर होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य हे उद्योगात पहिल्या क्रमांकाचे राज्य असून राज्याला यात अग्रेसर ठेवण्यासाठी उद्योगांना दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही सर्वांची जबाबदारी आहे, उद्योजक आणि स्थानिक जनतेला वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील खड्डे आदी अडचणींपासून दिलासा देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

# पान १ व ४ वरुन...

## जालना जिल्ह्याच्या...

कर्जमुक्ती' योजनेच्या पहिल्या टप्प्यात जालना जिल्ह्यातील १८ हजार ७९२ पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ११६ कोटी रुपये ऑनलाइन जमा करण्यात आले आहेत. कृषी विभागाच्या माध्यमातून २०२५-२६ मध्ये सुमारे ११ हजार शेतकऱ्यांना विविध योजनांतर्गत ६७ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत ५२ लाभार्थ्यांना सुमारे २ कोटी रुपयांचे कर्ज, तर ८७ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत ३९ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून, २२ समुदायाधारित संस्थांना सुमारे २२ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह योजनेअंतर्गत २०२५-२६ मध्ये अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या १२७ शेतकऱ्यांच्या वारसांना २ कोटी ५३ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

**पशुपालकांसाठी विमा, ई-पशुसेवेची सुविधा**

पशुधनाचा अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा रोगामुळे मृत्यू झाल्यास पशुपालकांना आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी पशुधन विमा योजना राबविण्यात येणार आहे. पशुवैद्यकीय सेवा अधिक सुलभ करण्यासाठी 'ई-पशुसेवा' ॲप विकसित करण्यात आले असून, त्याद्वारे पशुपालकांना पशूंच्या आजारांबाबत प्राथमिक सल्ला व उपचाराचे मार्गदर्शन घरबसल्या मिळणार आहे.

'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' लवकरच सुरू करण्यात येणार असून, महाडीबीटीच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट अनुदान जमा केले जाणार आहे. या योजनेत दूधाळ संकरित गायी, म्हशी तसेच कुक्कुट पक्षी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**महसूल सेवा आता घरपोच**

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान'अंतर्गत जिल्ह्यात समाधान शिबिरे घेण्यात आली. पहिल्या टप्प्यात ६४ मंडळांमध्ये घेण्यात आलेल्या शिबिरांमधून सुमारे ४० हजार लाभार्थ्यांना महसुली सेवा व विविध योजनांचा लाभ देण्यात आला. पाच विधानसभा मतदारसंघांत आयोजित शिबिरांमधून सुमारे २८ हजार नागरिकांना लाभ मिळाला.

नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने 'जालना मित्र' हे घरपोच शासकीय सेवा पोर्टल सुरू केले आहे.

**युवकांसाठी रोजगाराच्या संधी**

'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'अंतर्गत जिल्ह्यातील १ हजार ७०० प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केले असून, त्यांना १० कोटी ८३ लाख रुपयांचे विद्यावेतन ऑनलाइन देण्यात आले आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून जिल्ह्यात ४२३ नवीन उद्योग उभे राहिले असून, त्यातून तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

जलसंधारणासाठी १५ ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी आयोजित 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'मध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री मुंडे यांनी केले.

मतदार यादीतील नोंदी अचूक करण्यासाठी नागरिकांनी बूथ लेव्हल ऑफिसरला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. जनगणना २०२७ अंतर्गत जालना जिल्ह्यात पहिल्या टप्प्यातील घरोघरी माहिती संकलनाचे काम १०० टक्के पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते 'ई पशुसेवा ॲप' आणि 'ऊसमित्र' पोर्टलचे लोकार्पण करण्यात आले. तसेच 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' लोगोचे अनावरण करण्यात आले.

उपविभागीय अधिकारी कार्यालय जालना यांनी 'हर घर तिरंगा' अभियानातंर्गत आयोजित केलेल्या सायकल रॅलीस पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात करण्यात आली.

**अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव**

भाषणानंतर पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते पोस्को कायद्यातंर्गत दाखल गुन्ह्यात जलन गतीने तपास करुन वेळेत निकाल लागला या प्रकरणात कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी अमंलदाराचा सत्कार करण्यात आला. तसेच गौरवास्पद कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तसेच वीरपत्नी आणि वीरपित्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, मान्यवर आणि नागरिकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

ध्वजारोहण कार्यक्रमात पोलीस दलाच्या वतीने 'वंदे मातरम्', राष्ट्रगीत आणि राज्यगीत सादर करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.

यावेळी लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जालना येथे १८...

आणि प्रा. ॲड. विजय कमळे पाटील (पत्रकार संरक्षण कायदेतज्ज्ञ).

प्रमुख वक्तेः अक्रम ईद्रीस खान (भारत न्यूज पत्रकार) आणि अशोक मानकडे (संपादक, महाराष्ट्र विशेषांक, दिल्ली).

या सोहळ्यात प्रशासकीय अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पत्रकारितेसह इतर क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव केला जाईल. या कार्यक्रमाला पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष आमेर खान, वरिष्ठ जिल्हाध्यक्ष शेख मुजीबुद्दीन, उपजिल्हाध्यक्ष सुनील भारती, महिला जिल्हाध्यक्ष निकिता काळे महिला जिल्हा उपाध्यक्ष कुमारी मनीषा मगरे या आयोजकांनी केले आहे.



उद्या श्रावण सोमवार निमित्त भक्तगण बेल खरेदी करताना व नागपंचमी च्या निमित्त लाह्या भाजताना दिसत आहे छायाचित्र किरण खानापुरे

# रोटरी क्लब मिडटाऊनतर्फे मानेगाव जि. प. शाळेला दहा संगणक व चार सायकल भेट

## ग्रामीण विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्यासाठी संगणक शिक्षण अत्यंत गरजेचे -अलोक नानावटी

**जालना - प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनतर्फे मानेगाव खालसा (ता. जालना) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी देशप्रेमाची भावना जागृत करण्यासोबतच ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शाळेला इन्व्हर्टरसह दहा संगणक संचाचे लोकार्पण करण्यात येऊन चार मुलींना सायकल भेट देण्यात आल्या.

. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या



प्रवाहात आणण्यासाठी रोटरी क्लबतर्फे शाळेला १० संगणक संच सुपूर्द करण्यात येऊन संगणकासाठी आवश्यक शॉर्ट कीज व आवश्यक माहितीचे फ्लेक्स लावण्यात आले. खंडित विजेचा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी जम्बो इन्व्हर्टर व बॅटरीची सुविधा देखील क्लबतर्फे उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांचे संगणक शिक्षण अधिक प्रभावी होईल, असा विश्वास रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे अध्यक्ष अलोक नानावटी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. ते म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात संगणक ज्ञान विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया अधिक मजबूत होईल.

रोटरी व्हील्स ऑफ खूप बायसिकल फॉर गर्ल्स या प्रांतीय उपक्रमांतर्गत कालिका स्टील अलाईजच्या सहकार्याने ४ विद्यार्थिनींना सायकलींचे वितरण करण्यात आले सायकली मिळाल्यामुळे विद्यार्थिनींचा शाळेत येण्याचा प्रवास सुलभ होणार आहे.

प्रारंभी क्लबचे अध्यक्ष आलोक नानावटी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायण जाधव, सरपंच ज्ञानेश्वर राठोड, उपसरपंच राधिका जाधव, रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे सचिव मनमोहन भक्कड, सुरज गेही, प्रशांत बागडी, अमित शाह, पियुष अग्रवाल, पंकज अग्रवाल, अमोल जिंदल, मनोज अग्रवाल यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक संतोष नागवडे यांनी केले. शिक्षणासाठी मिळालेल्या नव्या सुविधांमुळे मानेगाव खालसा येथील स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

# डॉल्फिन इंग्लिश स्कूल वाटूर फाटा येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**परतूर - प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, राजाराम कुकडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण केले. या प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे केली.

व शाळेतील विद्यार्थिनींनी वंदे मातरम् या देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्रीमती कुकडे विद्या. श्रीमती सय्यद नसरीन. श्रीमती काळे साधना. श्रीमती चव्हाण वैष्णवी. कू .त्रिवेणी सनईकर . कु. सानू जाधव. शेळके गजानन. यांनी परिश्रम घेतले.

# मंठ्याच्या लेकीची राज्यस्तरीय भरारी; पूजा बनसोडे यांच्या यशाने तालुक्याची मान उंचावली!

## मंठ्याच्या पूजा बनसोडेंची MPSC मध्ये राज्यात मुलींमधून प्रथम क्रमांकाची दमदार कामगिरी

**मंठा - प्रतिनिधी**

मंठा तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. मंठा येथील पूजा दशरथ बनसोडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या () परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महाराष्ट्रात मुलींमधून प्रथम क्रमांक पटकावल्याची माहिती समोर आली आहे.पूजा बनसोडे यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर एकाच वेळी दुय्यम निबंधक वर्ग-१, सहाय्यक कक्ष अधिकारी आणि राज्यकर निरीक्षक या तीन महत्त्वाच्या पदांना गवसणी



घातली आहे. त्यांच्या या यशामुळे मंठा तालुक्याचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल झाले आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी पूजा बनसोडे यांचे यश प्रेरणादायी ठरले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत कठोर परिश्रम, योग्य नियोजन आणि ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास स्पर्धा परीक्षेत यश मिळवता येते, हे त्यांनी आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे.पूजा बनसोडे यांच्या या अभिमानास्पद यशाबद्दल मंठा तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, कुटुंबीय, मित्रपरिवार, शिक्षक तसेच नागरिकांकडून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# ॲग्रिकल्चरल कॉलेज फार्म को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या १११वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**शिवाजीनगर - प्रतिनिधी**

ॲग्रिकल्चरल कॉलेज फार्म को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, लि. पुणे- यांची १११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि. १३ ऑगस्ट) कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर येथील शिरनामे सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. सुनिल आलम होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर आणि सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषी संशोधन प्रकल्प डॉ. दत्तात्रय लाड उपस्थित होते. सोबतच कार्यक्रमात संस्थेचे उपाध्यक्ष श्री. पद्मनाथ गरसुळे, सचिव सुवर्णा टिळेकर, संचालक श्री. श्रीकृष्ण सावंत, श्री. अशोक पाटील, सौ. कल्पना वाकळे सौ. वैशाली पावले, राजू बामगुडे, संजय अवचीते, डॉ. नरेंद्र काशीद, श्री .नितीन शेळके, श्री .अशोक पाटील, श्री.अभिजीत मांढरे, सय्यद निसार, श्री.ज्ञानेश्वर गायकवाड यांच्यासह अन्य पदाधिकारी सभासद व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, शालेय वस्तू, गुलाब पुष्प देऊन कौतुक करण्यात आले. सेवानिवृत्त सभासदांचा शाल, शिफळ, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या युवक युवतींचा देखील गौरव या कार्यक्रमात करण्यात आला. प्रास्ताविक भाषणात संस्थेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा संचालक श्रीकृष्ण एस. सावंत सर यांनी उपस्थितांसमोर मांडला. अध्यक्षीय मनोगतात श्री. सुनिल आलम यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी पदाधिकारी, संचालक, सभासद आणि कर्मचारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. भविष्यातही सभासदांच्या हिताला प्राधान्य देत संस्थेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

प्रमुख पाहुणे डॉ. दत्तात्रय लाड आणि डॉ. सुभाष भालेकर यांनी मार्गदर्शन करताना संस्थेच्या माध्यमातून होत असलेली कामे आणि पारदर्शक व्यवहाराचे कौतुक केले. कमी सभासद असताना देखील उत्तम व्यवहार आणि मदतीची हमी देणारी हक्काची संस्था पाठीशी असण्याचा अभिमान व्यक्त केला. सदर सभेचे सूत्रसंचालन व आभार निवेदक गणेश मोढवे यांनी मानले.

# १७ ऑगस्ट नागपंचमी

श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून येते.श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिल्या जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते.नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो.नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे.याबाबतची कालियामर्दनाची आख्यायिका प्रसिद्ध आहे.या आख्यायिकेनुसार बालपणातील श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंस कालिया नावाच्या नागाला पाठवितो. परंतु श्रीकृष्ण कालियाचा पराभव करतो व यमुना नदीच्या पात्रातून श्रीकृष्ण सुरक्षीत वर येतात तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी.पराभवानंतर कालिया नाग श्रीकृष्णाची माफी मागतो आणि तेथुन निघुन जातो. त्यामुळे कालिया नागावरील कृष्णाच्या विजयाला सुध्दा नागपंचमीच्या स्वरूपात साजरी केली जाते.दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात.अशीही आख्यायिका आहे की,एक शेतकरी शेत नांगरणी करीत असतांना नागिणीच्या तीन पिल्लांचा मृत्यू झाला व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशी समजूत प्रचलित आहे.त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगर,वखर,कोणतेही खोदकाम करीत नाही किंवा कोणत्याही अवजारांचा वापर होत नाही.त्याचप्रमाणे घरकामात वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अवजारांचा वापर केला जात नाही.भाज्या चिरायच्या नाही,तव्याचा वापर नाही, कांडन नाही,कापन नाही,असे काही नियम आजही पाळले जातात.नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मुर्तीची पुजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात.देशात श्रावण माहिन्यात प्रत्येक सोमवारला अनेक मंदिरांमध्ये शेज(सजावट)केल्या जाते. त्याचप्रमाणे प्रत्येक देवतांच्या ठराविक दिवशी नीटनेटकी सजावट करून संपूर्ण श्रावण महिना मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने पाळला जातो.श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची,शंकराच्या पिंडेची व नागाची पुजाअर्चना करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदमय व सुखमय वातावरण दिसून येते.श्रावण मासात विविध सण येतात त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी अनेक सण येतात. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेला असलेला शिराळा तालुका नागपंचमीसाठी जगप्रसिद्ध आहे.सांगली जिल्ह्यातील हा एकमेव प्रदेश निसर्ग समृद्ध आहे.पूर्वी नागपंचमी उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा.तेव्हा नागपंचमीच्या एक महिना आधी येथील ‘‘नाग मंडळे‘‘नाग पकडायच्या मोहिमेला निघत.यानंतर पकडलेल्या नागांची (सापांची) नागपंचमी संपेपर्यंत योग्य प्रकारे काळजी घेतली जात असे. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जायची. परंतु वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ पासून सापांना पकडण्यावर बंदी आली.त्यामुळे काही वर्षांपासून शिराळ्यात फक्त नागाच्या प्रतीकात्मक मुर्तीची मिरवणूक काढली जाते. सध्या शिराळामध्ये ६५ नागराज मंडळे आहेत ही प्रतिकात्मक नाग पूजा करतात व प्रतिकात्मक नागमूर्तीची मिरवणूक काढतात.आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे.त्यामुळे संपूर्ण प्राणीमात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणासर्वांवर आहे. आजही भारतातील महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश ,गुजरात,केरळ, तामिळनाडू या प्रांतात नाग पूजा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते. मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतावर भारतातील तीर्थस्थान नागव्दार प्रसिद्ध आहे.याठीकाणी नागाचा वास मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे याठीकाणी संपूर्ण श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात भव्यदिव्य यात्रा असते. त्याचप्रमाणे याच परिसरात जटाशंकर नागाचे प्रसिद्ध ठिकाण आहे.येथील अशी आख्यायिका आहे की भगवान शंकरजींचे तांडव सुरू असतांना आपल्या केसांच्या जटा याच ठिकाणी आपटल्या होत्या.त्यामुळे या तिर्थक्षेत्राला जटाशंकर म्हणून संबोधले जाते. श्रावण महिन्यांत बेलपत्तीला जास्त महत्त्व आहे.त्यामुळे शंकराची व नागाची पूजाअर्चा करतांना बेलफुल वापरण्यात येतो.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त शिबिरात २५० जणांचे स्वयंस्फूर्त रक्तदान

**जालना -प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनानिमित्त मुस्तकीम हमदुले फाउंडेशन, जमियत-ए-उलेमा जालना, चार्ली ग्रुप जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. १५ ऑगस्ट रोजी जमजम हॉस्पिटलमध्ये आयोजित शिबिरात २५० जणांनी स्वयंस्फूर्त रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन जमियत-ए-उलेमाचे महाराष्ट्र अध्यक्ष हाफिज नदीम सिद्दिकी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी खासदार डॉ. कल्याण काळे हे होते, तर विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्राचे माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, प्रमुख पाहुणे मुफ्ती अब्दुल रहमान, मुस्तकीम हमदुले, मुफ्ती फईम, जुनेद हमदुले डॉ. आशिष राठोड, मुफ्ती सोहेल, मुफ्ती फारुक, मुफ्ती यूसूफ, बदर चाऊस, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष ॲड. संजय काळबांडे, विशाल धानुरे, नंदकिशोर जांगडे, मौलाना हसन मिल्ली, हाफिज अजहर, नगरसेवक फारूक तुंडीवाले, आसिफ अन्सारी, सय्यद मजहर, माजेद खान, बोर्डे जी,राजेंद्र जाधव, मोहम्मद माजेद, शेख जावेद,मा नगरसेवक सेवक गणेश राऊत,संदीप नाईकवाडे, कृष्णा पडुळ, विजय कांबळे, अन्वर मिर्झा,आरिफ़ खान,मोहम्मद नजीब, सय्यद अज़हर,



शाहआलम खान, हाजी अब्दुल हमीद, अतीक खान, फेरोज़ खान, सलीम हमदुले,शेख फ़ारुख,आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी हाफिज नदीम सिद्दिकी म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त हा उपक्रम राबविणे स्तुत्य आहे. मुस्तकीम हमदुले फाउंडेशन आणि जमियत- ए- उलेमा-ए-हिंद जालनाचे पदाधिकारी दरवर्षी असे कार्यक्रम घेऊन समाजोपयोगी काम करतात, आम्ही सर्व त्यांच्या पाठीशी आहोत. खा. डॉ. कल्याण काळे म्हणाले की, देशात सध्या असलेल्या माहोलमध्ये असे रक्तदान शिबिर घेऊन सर्वधर्मीय बंधुभाव जोपासला जात आहे. शेख शकीलआणि शेख वसीम हे दरवर्षी असा कार्यक्रम ठेवून पूर्ण वर्षभर जे काम करतात, ते कौतुकास्पद आहे. राजेश टोपे म्हणाले की, जिल्ह्यामधून शहरामधून मोठ्या प्रमाणात रुग्ण येतात. त्यांना शेख शकील आणि शेख वसीम हे सर्वतोपरी सहकार्य करतात. एक लोकप्रतिनिधी म्हणून तुमच्या पाठीशी आहे, असे ते म्हणाले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, युवक काँग्रेसचे अध्यक्ष शेख वसीम,आणि मुस्तकीम हमदुले फाउंडेशन, जमियत-ए-उलेमा जालना, चार्ली ग्रुपने विशेष परिश्रम घेतले.

## जालना येथे १८ ऑगस्टला ९ वे आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन व पुरस्कार सोहळा

### *विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती*

**जालना - प्रतिनिधी**

इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या वतीने ९ व्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन आणि पुरस्कार सोहळ्याचे आयोजन यंदा जालन्यात करण्यात आले आहे. हा सोहळा मंगळवार, १८ ऑगस्ट २०२६ रोजी अंबड रोडवरील मातोश्री लॉन्स येथे पार पडणार आहे. पत्रकारांचे विविध प्रश्न, पत्रकारिता क्षेत्रातील योगदान आणि संघटनात्मक समन्वय साधणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा:

**अध्यक्ष स्थान: माजी आमदार कैलास गोरंट्याल**

प्रमुख उद्घाटक व मान्यवर: पर्यावरण आणि पालकमंत्री पंकजाताई मुंडे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, खासदार कल्याण काळे, सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील, सार्वजनिक आरोग्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, तसेच उद्योजक घनश्याम गोयल, सुनील आर्दाड आणि भास्कर पाटील दानवे.

विशेष मार्गदर्शक: सेराज अहमद कुरेशी (राष्ट्रीय अध्यक्ष, इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन) ***(पान २ वर)***



तांडा बजार येथील शनिवारी स्वातंत्र्य दिन मदरसा दारूल उलूम उमरीया या मदरस्यात साजरा करण्यात आला त्या वेळी मौलाना अब्दुल अजीज़ मोहम्मदखॉ मुल्तानी,मिल्ली नाजीम मदरसा दारूल उलूम उमरीया तांडा बजार,सलीम मुल्तानी फकीर मोहम्मद सुलेमान शेख, कार्यकर्ते अब्दुल सत्तार मित्र मंडळ,नाजीम खॉन हूर खॉन मुल्तानी कॉन्ट्रॅक्टर, अबू अंजर खॉन अजीज खान मुल्तानी कार्यक्रमात उपस्थित होते. ***छायाचित्र:- शेख अफसर सिल्लोड***

## शांतिनिकेतन विद्यामंदिर मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील संभाजीनगर प्रभागातील समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शांतिनिकेतन विद्यामंदिर या या शाळेत ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. माजी सैनिक एकनाथराव हंडे यांच्या हस्ते व संस्थेचे संचालक हरिहर शिंदे, नगरसेवक अश्विन अंबेकर, नंदकुमार जाधव, प्रा.राम कदम, किसनराव राठोड, जगदीश अग्रवाल, कविता अग्रवाल, पांडुरंग काळे, जीवन खंडागळे




मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, प्रेमला पंडित, प्रा.विजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते भाषणे व शारीरिक कवायती करून उपस्थित त्यांची मने जिंकली.

स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धां व स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शाळेतील प्राथमिक, माध्यमिक व नर्सिंग विभागाचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मृद व जलसंवर्धनासाठी 'रील फॉर साईल अँण्ड वॉटर कन्झर्वेशन' स्पर्धेत युवकांनी सहभाग घ्यावा

### *१६ ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताह रील्स स्पर्धेचे आयोजन*

**मुंबई - प्रतिनिधी**

मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन 'रील्स स्पर्धेचे 'आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करुन इनस्टाग्राम () च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी रील फॉर साईल अँण्ड वॉटर कन्झर्वेशन' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या रील स्पर्धेत राज्यातील युवक - युवतींनी उत्सफूर्त सहभागी घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने राज्यव्यापी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर, जलसंधारणाची शपथ असे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे.

रील स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचा पात्र वयोगट १५ ते ३० वर्षे असा ठेवण्यात आला आहे. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची तयार करावी. व्हिडीओ/ रिलच्या सुरुवातीला व्हिडीओ / रिलचा उद्देश, स्वतःचे संपूर्ण नाव, जिल्ह्याचे नाव नमूद सहभागी स्पर्धकांनी करणे आवश्यक आहे. स्पर्धाकांने स्वतः च्या वर पोस्ट करावी. स्पर्धकांनी मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत ला करणे बंधनकारक राहील.

यासाठी अधिकृत हॅशटॅग वापरणे अनिवार्य राहणार आहे.

**रिल्स बनवण्यासाठी विषय**

माती संवर्धन, पाणी बचत, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जलसंधारण पद्धती, माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना, आजचे संवर्धन उद्याचे सुरक्षित भविष्य असे रील्स बनवण्यासाठी विषय देण्यात आले आहेत.

रील्स करीता गुणांकन पद्धती पुढील प्रमाणे असणार आहे. विषय व संदेश - ३० गुण, कल्पकता -२५ गुण, प्रभावी सामाजिक संदेश - २० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता - १५ गुण, - १० गुण असे एकूण - १०० गुण असणार आहेत. केवळ किंवा वर विजेता निश्चित न करता तज्ज्ञ परीक्षण आणि या दोन्हींचा समतोल ठेवण्यात येणार आहे. गुणांकानुसार विजेत्याची निवड करण्यात येईल.

**विजेत्यांना बक्षीस**

राज्यासाठी एकच अधिकृत हॅशटॅग वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रिल्स आणि राज्यभरातून १० हजार रिल्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रिल स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार ₹२५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार ₹१५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार ₹१० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष ''युवा मृद-जलदूत'' म्हणून गौरविण्यात येणार आहे

''एक ... मातीसाठी !, एक ... पाण्यासाठी !, एक ... सुरक्षित भविष्यासाठी !'' हा रिल्स प्रचारासाठी मुख्य संदेश आहे.

## नायब तहसीलदार सतीश तायडे यांचा गौरव



**जालना - प्रतिनिधी**

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरगणना कामकाजात जालना जिल्हा महाराष्ट्र राज्यात प्रथम स्थानावर आला. या कामकाजातील जिल्हास्तरीय उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हाधिकारी कार्यालयातील सामान्य प्रशासन विभागातील नायब तहसीलदार सतीश तायडे यांना स्वातंत्र्यदिन पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत आदींची विशेष उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.